# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय

"वनवर्धन", प्रधान डाकघर कार्यालयासमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३

कार्यालय - (०२३१) २६५३६३२, निवास - २६५३६३४, फॅक्स - २६५९२३३

E-mail - ccftkolhapur@gmail.com


**अतितात्काळ**

विषय :- वनरक्षक भरती प्रक्रिया २०१६.
खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांकरीता लघुयादी प्रसिध्द करणेबाबत.

क्रमांक - कक्ष-४-४/आस्था/व.भ.२०१६/ ४६७७ /२०१६-१७
कोल्हापूर, दिनांक २९ नोव्हेंबर,२०१६.

प्रति,

मुख्य परिचनल अधिकारी
मे.महाऑनलाईन लि.मुंबई.

कोल्हापूर वनवृत्तामधील वनरक्षक भरती प्रक्रिया २०१६ चे अनुषंगाने ऑनलाईनद्वारे अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची शारिरीक क्षमता चाळणी चाचणी (पुरुष उमेदवार ५ कि.मी./महिला उमेदवार ३ कि.मी. अंतर अर्ध्या तासात पार करणे) दिनांक ५.११.२०१६ ते १४.११.२०१६ या कालावधीमध्ये घेण्यात आलेली आहे.

सदर चाळणी चाचणीमध्ये अर्ध्या तासात ज्या उमेदवारांची विहीत अंतर पार केलेले आहे, अशा उमेदवारांची त्यांच्या धावण्याच्या वेळेनुसार सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार करण्यात आलेली असून सदर यादीच्या अनुषंगाने **खुल्या प्रवर्गामध्ये रिक्त असलेल्या ४८ पदांचे अनुषंगाने प्रथम टप्प्यामध्ये खुल्या प्रवर्गासाठी पदसंख्येच्या १:३ या प्रमाणात तात्पुरती लघुयादी तयार करण्यात आलेली असून ती यासोबत आपणाकडे पाठविण्यात येत आहे.**

कृपया सदरची तात्पुरती लघुयादी आपले संकेतस्थळावर तात्काळ प्रसिध्द करावी तसेच खालील दिनांकास व वेळेस त्यापुढे नमूद केलेल्या प्रवर्गामधील उमेदवारांना Physical Measurement & Documents Verification करीता कोल्हापूर वृत्त कार्यालयामध्ये उपस्थित राहणेकरीता आपलेद्वारे उमेदवारांच्या भ्रमणध्वनीवर **SMS Alert तात्काळ द्यावेत,** ही विनंती.

| अ.क्र. | दिनांक | प्रवर्गाचा तपशील |
|---|---|---|
| १. | **६.१२.२०१६ सकाळी १०.०० वाजता** | खुला प्रवर्ग १ ते २४ उमेदवार |
| | | महिला प्रवर्ग १ ते ४२ उमेदवार |
| | | होमगार्ड प्रवर्ग १ ते ६ उमेदवार |
| | | माजी सैनिक प्रवर्ग १ ते २१ उमेदवार |
| | | भूकंपग्रस्त प्रवर्ग १ ते ३ उमेदवार |
| | | प्रकल्पग्रस्त/ धरणग्रस्त प्रवर्ग १ ते ९ उमेदवार |
| | | खेळाडू प्रवर्ग १ ते ९ उमेदवार |

| अ.क्र. | दिनांक | प्रवर्गाचा तपशील |
|---|---|---|
| २ | **७.१२.२०१६ सकाळी १०.०० वाजता** | अंशकालीन उमेदवार १ ते ४० |
| | | रोजंदारी वनमजूर १ ते १६० उमेदवार |

२/- वरील तात्पुरत्या लघुयादीच्या अनुषंगाने सोबतच्या सूचनासुध्दा आपले संकेतस्थळावर तात्काळ प्रसिध्दीस द्याव्यात, ही विनंती.

सही/-
(अे.एम.अंजनकर)
सदस्य सचिव, प्रादेशिक निवड समिती
तथा उपवनसंरक्षक सातारा वनविभाग

**प्रतिलिपी** :- उपवनसंरक्षक कोल्हापूर वनविभाग यांना माहिती व आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी.

२/- सदर भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने आवश्यक पूर्वतयारी तात्काळ करावी.

# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय

"वनवर्धन", प्रधान डाकघर कार्यालयासमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३

☎ कार्यालय - (०२३१) २६५३६३२, निवास - २६५३६३४, फॅक्स - २६५९२३३

E-mail - ccftkolhapur@gmail.com


## वनरक्षक भरती प्रक्रिया २०१६

खुल्या प्रवर्गातील एकूण ४८ पदासाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या लघुयादीमधील उमेदवारांची शारिरीक मोजमापे व मूळ कागदपत्रांची तपासणी **दिनांक ६.१२.२०१६ व ७.१२.२०१६** या कालावधीमध्ये समितीमार्फत करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने तात्पुरत्या लघुयादीमधील उमेदवारांना खालीलप्रमाणे **सूचना** देण्यात येत आहत.

१. प्रथम टप्प्यामध्ये फक्त खुल्या प्रवर्गासाठी रिक्त असलेल्या ४८ पदाकरीता सदरची तात्पुरती लघुयादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर तात्पुरत्या लघुयादीमधील उमेदवारांची शारिरीक मोजमापे घेण्यात येऊन त्यामध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच सदर दिवशी मूळ कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल. याकरीता उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये दावा केलेनुसार खालीलप्रमाणे मूळ कागदपत्रे सोबत आणावीत तसेच **सदरचे सर्व कागदपत्रांची एक साक्षांकित (Attested) प्रत सोबत आणावी.**

(१) जातीचे प्रमाणपत्र, उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र.

(२) एस.एस.सी./ एच.एस.सी. गुणपत्रके व प्रमाणपत्रे, एका पेक्षा जास्त संधीमध्ये उत्तीर्ण असल्यास तद्संबंधीची सर्व गुणपत्रके

(३) ऑनलाईन अर्जाची छायाप्रत.

(४) प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त/भूकंपग्रस्त/अंशकालीन/खेळाडू / होमगार्ड/रोजंदारी वनमजूर संबंधी सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र

(५) महिला उमेदवारांच्या बाबतीत जाहिरातीमध्ये नमूद केलेप्रमाणे सक्षम प्राधिकारी यांचेकडील नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र

(६) डोमिसाईल प्रमाणपत्र (महाराष्ट्र राज्याबाहेर वास्तव्य असलेल्या उमेदवारांना फक्त खुल्या प्रवर्गासाठीच विचार करण्यात येईल व खुल्या प्रवर्गासाठी लागू असलेले निकष राहतील)

(७) खेळाडू उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णय दिनांक १.७.२०१६ मधील तरतूदीनुसार संबंधीत विभागीय उपसंचालक यांनी निर्गमीत केलेले मूळ वैधता प्रमाणपत्र सोबत आणावे. यासंबंधीच्या सविस्तर सूचना www.kolhapurforest.co.in या संकेतस्थळावर यापूर्वीच प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

(८) माजी सैनिकांच्या बाबतीत Discharge Certificate तसेच Army Graduation चे प्रमाणपत्र सोबत आणावे.

(९) अंशकालीन उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयामध्ये नोंद असलेले प्रमाणपत्र सोबत आणावे. अन्यथा त्यांचा अंशकालीन या राखीव प्रवर्गासाठी विचार करण्यात येणार नाही.

(१०) रोजंदारी वनमजूर याकरीता ऑनलाईन अर्जामध्ये दावा केलेल्या उमेदवारांनी त्यांना सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र सोबत आणावे. असे प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांचा रोजंदारी वनमजूर या राखीव प्रवर्गासाठी विचार करण्यात येणार नाही.
(११) होमगार्ड उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमीत केलेले मूळ प्रमाणपत्र सोबत आणावे.
(१२) शासन सेवेत असलेल्या उमेदवारांनी त्यांचे कार्यालय/विभाग प्रमुखांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करावे.
(१३) स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य असल्यास, तसे प्रमाणपत्र सादर करावे.

तात्पुरत्या लघुयादीमधील उमेदवारांची सर्वप्रथम नियुक्त समितीमार्फत शारिरीक मोजमापे घेण्यात येतील. यामध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच मूळ कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल. जे उमेदवार शारिरीक मोजमापे व मूळ कागदपत्रांचे तपासणीमध्ये पात्र ठरतील, त्या उमेदवारांचा समावेश अंतिम लघुयादीमध्ये करण्यात येईल.

फक्त अंशकालीन व रोजंदारी वनमजूर या समांतर आरक्षणाचा दावा केलेल्या सर्व उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर उमेदवारांची सर्वप्रथम मूळ कागदपत्रांची तपासणी नियुक्त समितीमार्फत दिनांक ७.१२.२०१६ रोजी करण्यात येणार आहे. मूळ कागदपत्रामध्ये उमेदवार पात्र ठरल्यास त्याची त्याच दिवशी नियुक्त समितीमार्फत शारिरीक मोजमापे घेण्यात येतील व शारिरीक मोजमापामध्ये पात्र ठरल्यास त्यांचा समावेश लघुयादीमध्ये करण्यात येईल.

दिनांक ६ व ७.१२.२०१६ रोजी तात्पुरत्या लघुयादीमधील उमेदवारांची शारिरीक मोजमापे व मूळ कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर यामध्ये अपात्र ठरलेले उमेदवारांचे संख्येइतके त्याच प्रवर्गामधील सर्वसाधारण गुणवत्तेनुसार (धावण्याचे टायमिंग) उमेदवारांची पूरक यादी प्रसिध्द करण्यात येईल व त्यांना भरती प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची संधी देण्यात येईल. अशा पूरक लघुयादी मधील उमेदवारांची पुन्हा शारिरीक मोजमापे व मूळ कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल व पुढील कार्यवाही पूर्ण केली जाईल.

सही/-
(अे.एम.अंजनकर)
सदस्य सचिव, प्रादेशिक निवड समिती
तथा उपवनसंरक्षक सातारा वनविभाग